# जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण
## जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे

टोल फ्री क्रमांक 1077 दुरध्वनी क्रमांक 020-26123371 E-Mail collector.pune@maharashtra.gov.in

---

वाचा :- 1) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005,
2) मुंबई पोलीस अधिनियम 1951,
3) भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम 1897
4) मा. मुख्य सचिव महाराष्ट्र शासन यांचेकडील महसूल व वन आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन अधिसुचना No. DMU/2020 CR.92 DisM-1, दिनांक 17/04/2020

---

क्र. जि.आ.व्य./कावि/1535/2020.
पुणे दिनांक 09/06/2020

**विषय :- कोराना विषाणू आजाराच्या (कोवीड-19) अनुषंगाने प्रतिबंधित क्षेत्र (Containment Zone) घोषित करणेबाबत.**

**परिपत्रक**

आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 मधील कलम 25 अन्वये जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे. व त्यातील पोट कलम 2(अ) नुसार जिल्हाधिकारी हे उक्त प्राधिकरणाचे पदसिद्ध अध्यक्ष आहेत.

राज्य शासनाने कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा 1897 दिनांक 13/03/2020 पासून लागू करुन खंड 2, 3 व 4 मधील तरतुदीची अंमलबजावणीसाठी अधिसूचना निर्गमित केलेली आहे. त्याबाबतची नियमावली महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, यांचेकडील शासन क्र. कोरोना- 2020/प्र.क्र.58/आरोग्य-5 दिनांक 13/03/2020 दि. 14/03/2020 व दि. 15/03/2020 अन्वये प्रसिध्द केली आहे. आणि जिल्हाधिकारी यांना सक्षम प्राधिकारी घोषित केलेले आहे.

उपरोक्त वाचा क्र. 4 अधिसुचनेमधील परिच्छेद क्र. 3 (i) व (ii) नुसार (Containment Zone) जिल्हादंडाधिकारी यांनी जाहीर करणेचे आहेत. तसेच ज्या परिसरात नव्याने कोव्हीड-19 चे बाधीत रुग्ण आढळून येतील. त्या भागात तात्काळ प्रतिबंधित क्षेत्र घोषित करणेबाबत निर्देशित करण्यात आलेले आहे.

सद्यस्थितीत पुणे जिल्हयात उपविभागीय अधिकारी तथा INCIDENT COMMANDER यांचे मार्फतीने कोरोना विषाणू बाधित भागात प्रतिबंधित क्षेत्र (Containment Zone) किंवा सुक्षम प्रतिबंधित क्षेत्र ( Micro Containment Zone) घोषित करण्यात येत आहे. प्रतिबंधित क्षेत्र घोषित करताना सदर परिसरात 1 किंवा 2 रुग्ण आढळले असताना संपुर्ण परिसर प्रतिबंधित क्षेत्र घोषित करण्यात येत आहे. त्यामुळे त्या परिसरातील उद्योग व औद्योगिक आस्थापना देखील बंद करण्यात येत आहेत असे निदर्शनास येत आहे.

**तरी सर्व उपविभागीय अधिकारी तथा INCIDENT COMMANDER यांना सुचित करण्यात येते की, त्यांचे कार्यक्षेत्रात प्रतिबंधित क्षेत्र घोषित करताना 1 किंवा 2 रुग्णांचा आढळ झाल्यास त्या परिसरातील उद्योग व औद्योगिक आस्थापना बंद करण्यात येऊ नयेत.**

**सोसायटी मध्ये रुग्ण आढळला असलेस, सोसायटी मधील परिसर प्रतिबंधित क्षेत्र घोषित करण्यात यावा. परंतु सोसायटी जवळील स्वतंत्र उद्योग व औद्योगिक आस्थापना बंद करु नयेत.**

**उद्योग व औद्योगिक आस्थापनेमध्ये 1 किंवा 2 रुग्ण आढळल्यास, रुग्णाच्या संपर्कात आलेल्या कर्मचाऱ्यांचे (Contact Traceing) करुन आरोग्य तपासणी करणेत यावी. सर्व उद्योग व औद्योगिक आस्थापना बंद करण्यात येऊ नये.**

**तसेच रुग्ण आढळून आलेल्या परिसरातील उद्योग व औद्योगिक आस्थापना स्थानिक परिस्थीती विचारात घेऊन, कोरोना विषाणू प्रतिबंधक उपाययोजनांच्या अनुषंगाने बंद करणे आवश्यक असल्यास, याबाबत जिल्हाधिकारी यांची पुर्व परवानगी घेणेत यावी. तद्नंतर सदरचा परिसर प्रतिबंधित क्षेत्र (Containment Zone) म्हणून घोषित करावा.**

मा. जिल्हाधिकारी सो
यांचे मान्यतेने

( डॉ. जयश्री कटारे )
निवासी उपजिल्हाधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,पुणे

प्रति:- सर्व उपविभागीय अधिकारी तथा INCIDENT COMMANDER पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी रवाना.

Scanned with CamScanner